## एम.बी.मोरे महीला महाविदयालयात करिअर मार्गदर्शनपर व्याख्यान सत्राचे आयोजन

एम. बी.मोरे फाउंडेशन संचलित कला वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविदयालयाचा 'करिअर मार्गदर्शन विभाग', सुदर्शन केमिकल्स इं लि. आणि कर्वे सामाजिक संस्था, पुणे यांच्या संयुक्त विदयमाने मंगळवार दि.२१/०१/२०२० रोजी महाविदयालयाच्या विदयार्थ्यीनींसाठी करिअर मार्गदर्शन तसेच शिक्षकांसाठी प्रभावी अध्यापनासाठी मार्गदर्शनपर दोन स्वतंत्र व्याख्यानाचे आयोजन केले.

सुप्रसिध्द व्यक्ते आणि उपक्रमशील प्राध्यापक डॉ. श्री. विजय नवले यांनी विदयार्थ्यीनींना करिअरची निवड, विविध शॉर्ट टर्म कोर्सेस, मुलींसाठी भविष्यातील उत्तम संधी, अभ्यासाचे नियोजन, वाचनाची आवड यांवावत मजेशीर पध्दतीने सविस्तर मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात महीला महाविदयालयातील तसेच इतर महाविदयालयातील आमंत्रित शिक्षकांसाठी व्याख्यानाचे आयोजन केले. आजच्या स्पर्धेच्या युगातील विदयार्थ्यांच्या गरजा, अध्यापनासाठी लागणारे पोषक वातावरण निर्मिती, संदर्भग्रंथाचा जास्तीत जास्त वापर यांवावत मार्गदर्शन केले आणि एकमेकांचे अनुभव देखील सांगितले.

या दोन्ही सत्रामध्ये महीला महविदयालयाच्या १४० विदयार्थ्यीनी आणि १७ शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी महीला महाविदयालयाचे प्राचार्य श्री. प्रसन्न अशोक म्हसळकर, सुदर्शन केमिकल्स चे श्री. रूपेश मरवते, कर्वे सामाजिक संस्थेचे श्री. सुनिल साळुंखे, श्री. जाधव, कु. कल्पना केंजाळे, महीला महाविदयालयाच्या 'करिअर मार्गदर्शन विभाग'प्रमुख प्रा. प्रतिमा भोईर, सहकारी प्रा. प्रणाली महाडीक आदी उपस्थित होते.

Scanned by CamScanner